# प्रकरण पहिले

## ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास

## प्रकरण पहिले

## ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास

प्रतिमा इंगोले १९७०-८० या दशकातील विदर्भातील एक महत्वाच्या कथालेखिका आहेत. ग्रामीण जीवनानुभवाचे अत्यंत वास्तवचित्रण त्यांनी आपल्या कथांतून केलेले आहे. विशेषत: विदर्भातील स्त्री जीवनाच्या विविध समस्या मांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्या एक प्रतिभावान कथालेखिका आहेत. ग्रामीण कथालेखामध्ये कथा लेखिकेचा अभाव आढळतो. त्याची काही प्रमाणात उणीव भरुन काढण्याचा प्रयत्न इंगोले यांनी केलेला आहे. प्रस्तुत प्रबंधिकेत त्यांच्या "लेक भुईची", "अकसिदीचे दाने", "सुगरनचा खोपा" या कथासंग्रहाच्या आधारे त्यांच्या कथालेखनाचे विशेष पहावयाचे आहेत. तत्पुर्वी या प्रकरणात ग्रामीण कथेचे स्वरुप आणि विकास लक्षात घ्यावयाचा आहे. त्यासाठी ग्रामीण कथेच्या वाटचालीत व विकासात महत्वपूर्ण अशा कथाकारांनी योगदान दिलेले आहे. त्या कथाकारांच्या अनुषंगाने येथे ग्रामीण कथेचे स्वरुप व विकास मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ग्रामीण कथा म्हणून ज्यावेळी तिच्या स्वतंत्र अस्तित्वाचा मागोवा घ्यावा लागतो. तेव्हा ग्रामीण कथेच्या सुरुवातीचा काळ म्हणजे ११व्या शतकातील "महानुभाव गद्य" त्यामध्ये ग्रामीण कथेच्या सुरुवातीच्या खुणा दिसतात. त्यानंतर ग्रामीण कथा लिहिली ती हरिभाऊ आपटे यांनी. त्यामुळे मध्यंतरीचा काळ सोडला तर हरिभाऊंच्या कथेने ग्रामीण कथेची सुरुवात झाली असेच

म्हणावे लागेल. कारण हरिभाऊंच्या या वास्तवादी कथेत ग्रामीण कथेच्या पाऊलखुणा आढळतात. त्यामुळे आढावा घेण्याच्या दृष्टीने त्यांची "काळ तर मोठा कठीण आला" या कथेमध्ये ग्रामीण कथेच्या काही खुणा दिसतात. हरिभाऊ आपटे यांच्या कथेमध्ये त्यांची "काळ तर मोठा कठीण आला" ही सुरुवातीची ग्रामीण कथा म्हणून ओळखली जाते. या कथेत हरिभाऊ आपटे यांनी ग्रामीण जीवनात दुष्काळामुळे झालेले हाल त्यांनी रामजी आणि जयाबाई या शेतकरी कुटुंबाची झालेली वाताहात चित्रित केली आहे. हरिभाऊंच्या कथेत ग्रामीणत्वाचा नकळत अविष्कार होतो. जरी त्याकाळी ग्रामीण कथेची वेगळी प्रेरणा नसली तरी वास्तव चित्रणातून निर्माण झालेली ही कथा आहे आणि या कथेविषयी आनंद यादव यांनी मांडलेले मत येथे नोंदवावेसे वाटते. "हरिभाऊंची "काळ तर मोठा कठीण आला." ही स्फुट गोष्ट एक वाङ्‌मयीन अपघात वाटते. ग्रामीण जीवनाच्या खास जाणीवा घेऊन ती जन्माला आलेली नाही. केवळ आज ग्रामीण वाङ्‌मयाच्या विपुलतेमुळे, त्याच्या जन्माचा शोध घेत घेत भूतकाळात जाताना ती एक खुण दिसते एवढेच. यापलिकडे या कथेने ग्रामीण वाङ्‌मयासाठी काही केले आहे असे वाटत नाही." १

हरिभाऊंच्या या कथेच्या निर्मितीमागील प्रेरणा व तत्कालीन परिस्थितीचा विचार केल्यास आनंद यादव यांचे मत योग्यच आहे. तत्कालीन ग्रामीण वाङ्‌मय म्हणून वेगळ्या अशा काही प्रेरणा नव्हत्या. एक दुष्काळावरील वृत्तांताच्या रूपाने सादर केलेली ही कथा आहे. आणि महत्वाचा आधार आहे. तो तत्कालीन वास्तवावर आधारीत यामुळेच या कथेचा ग्रामीण कथेचा उगमाशी संबंध जोडला जातो.

१९२० नंतरच्या काळात भारतीय साहित्यात बदल घडविण्याचे कार्य म. गांधींनी केले हे सत्य नाकारून चालत नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या लढयात म. गांधी यांचा वाटा महत्वाचा आहे. म.गांधी यांच्या विचाराचा प्रभाव संपूर्ण भारतीय जीवनावर झाला होता. याचाच एक भाग म्हणून "खेडयाकडे चला" या गांधीजींच्या आव्हानानुसार अनेक शहरी लेखक ग्रामीण भागाकडे वळले आणि त्याचा उपयोग ग्रामीण वाङ्.मयात भर पडण्यात झाली. निदान वास्तव नसली तरी प्रथमत: रंजकतेचा हेतू समोर ठेवून शहरी लेखक वर्ग व ब-याच प्रमाणात वाचकवर्गही त्याकडे झुकला गेला आणि खेडयातील जीवन, निसर्ग असे वर्णन वाङ्.मयातून येवू लागले आणि त्याच प्रमाणे कथेतही येवू लागले. एकंदरच गांधीवादाचा परिणाम ग्रामीण साहित्यावर झाला. या काळातील ग्रामीण कथेत तत्कालीन परिस्थितीचा उल्लेख क्वचितच आढळतो. त्यांनी आपल्या कथालेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठेवला तो रंजनवादी. याचे उत्तम उदाहरण म्हणून प्रादेशिक कथाकार म्हणून ओळखले जाणारे वि.स. सुखठणकर. १९३१ साली प्रसिध्द झालेला त्यांचा "सहयाद्रीच्या पायथ्याशी" हा कथासंग्रह म्हणजे आजच्या व कालच्या गोमंतकाचे दर्शन असाच त्यांनी त्या कथासंग्रहाचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये आठ कथांचा समावेश आहे. गोमंतकीय जीवनातील अनुभव जरी सांगण्याचा त्यांचा हेतू असला तरी प्रामुख्याने त्यात देवदासी पोर्तुगीज अधिकारी, धर्मोपदेशक, गोव्यातील जमीनदार यांचे वर्णन प्रकर्षाने येते. गोवा आणि तेथील परिसर चित्रण करताना तेथील सण, उत्सव, रूढी-परंपरा यांचाही उल्लेख त्यांच्या कथांमधून आढळतो. परकियांच्या लाचारीला चटावलेली देशी प्रवृत्ती त्याचप्रमाणे हिन्दु आणि ख्रिश्चन यांनी धर्माधर्मात न भांडता एकोप्याने राहिले पाहिजे. हे त्यांनी आपल्या कथेतून मांडण्याचा प्रयत्न केला

आहे. त्याचबरोबर गोव्यातील निसर्गाचा परिचयही त्यांच्या कथांतून होतो. एकंदर त्यांचे कथाविश्व अभ्यासल्याने त्यांच्या कथांवर गांधीवादाचा परिणाम झाल्याचे आढळते. लक्ष्मणराव सरदेसाई : "कल्पवृक्षाच्या छायेत", "सागराच्या लाटा", "वादळातील नौका", "ढासळलेले बुरूज" हे कथासंग्रह म्हणजे गोव्यातील निसर्गवर्णना-सह गोव्याचे जीवन त्यांनी आपल्या कथांमधून रेखाटले आहे. गोव्या-तील जीवनपध्दती बरोबरच -हास होत चाललेली जुनी मुल्ये यांचा वेध "मोडलेला माड" आणि "ढासळलेले बुरूज" या कथांमध्ये घेतलेला आहे. त्याच बरोबर कथेच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रुढी व परंपरेवर त्यांनी अचूक बोट ठेवले आहे. हे करताना त्यांच्या कथां-मध्ये तेथील निसर्ग आणि परिसर यांचेही चित्रण केले आहे.

सुखटणाकर, सरदेसाई, यांच्या समकालीन काही ग्रामीण कथालेखक आहेत. या कथालेखकांवर प्रामुख्याने गांधीवादाचा प्रभाव आढळून येतो. त्याचबरोबर साम्यवादाची परिणाम या काळात ग्रामीण कथेवर झाला. हा परिणाम एका बाजूने होत होता. तर त्याचवेळी भारतीय स्वातंत्र्यासाठी खेडयातूनही चळवळीचे वारे वाहू लागले होते. याचाही परिणाम या काळातील ग्रामीण कथेवर झाला.

श्री.म. माटे :

मराठीतील लघुकथेच्या कालखंडात माटे यांनी कथालेखनास सुरूवात केली. परंतु कुठल्याही वादाचा त्याच्या कथेवर परिणाम दिसत नाही. स्वत:च्या कथालेखनाची वाट त्यांनी निर्माण केली आहे.

१९४१ साली "उपेक्षितांचे अंतरंग" हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. माटे हे "हाडाचे समाजसुधारक" होते. तत्कालीन वाङ्.मयाचा परिणाम त्याच्या कथेमध्ये आढळत नाही. याला कारणे अनेक असतील परंतु त्यांच्यातील माणूस जागा झाला; हे म्हणावे लागेल. त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या अनुभवातून त्यांनी आपली कथा साकारली आहे. माटे हे स्वत: समाजसुधारक होते. त्यांनी ज्या लोकांचे जीवन चित्रण केले ते त्यांना भेटलेले लोक होते. जरी माटे यांनी ते जीवन भोगले नसले तरी प्रत्यक्ष पाहिले होते आणि त्या माणसांच्या आपुलकीतून त्यांनी हे कथालेखन केले.

"बन्सीधर", "आता तू कुठेरे जाशील ?" या कथेतील बन्सीधराचे पोरकेपण त्यांनी जवळून पाहिले आहे. म्हणून "बन्सीधर ! आता तू कुठे रे जाशील ?" ही हाक अंत:करणाचा वेध घेते आणि बन्सीधराच्या आयुष्याची ओढाताण दिसून येते. माटे यांच्या कथेतील बहुतेक व्यक्तिरेखा या उपेक्षित समाजातील आहेत. त्यांचे दु:ख मांडण्यात आणि त्यांना भोगाव्या लागणाऱ्या वेदना मांडण्यात माटे यांनी पुढाकार घेतला. माटे यांच्यावर प्रचारकीचा ठपका ठेवला गेला. तरी एकूण वाङ्.मयाकडे दृष्टी वळविल्यास तो प्रत्यय येत नाही. त्याच्या कथेतील पात्रे ही गुन्हेगारी समाजातील खालच्या थरातील आहेत. महार, मांग, रामोशी, बेरड अशी ही ग्रामीण भागातील उपेक्षित माणसे त्यांच्या कथेमध्ये येतात. समाजाच्या दृष्टीने दुष्ट ठरविला गेलेला माणूस हा दुष्ट नसतो. तर त्याला त्याची परिस्थिती दुष्ट बनविते. हा त्यामागील पार्श्वभूमीचा वेध माटे आपल्या कथेमध्ये घेतात. माटे यांनी ग्रामीणतेशी, अनुभवाशी आणि सामाजिकतेशी एकनिष्ठ राहून कथालेखन केले आहे.

परिस्थितीने माणूस लाचार गुन्हेगार, दरोडेखोर होतो हे दाखवून दिले आहे. एवढयातूनही तो आपली माणुसकी कशी जतन करत असतो याचे उत्तम उदाहरण "कृष्णाकाठचा रामोशी" या कथेत वर्णन केले आहे. सत्या रामोशी हा गुन्हेगार असला तरी तो स्वत:साठी गुन्हे करत नाही. समाजातील गोरगरीब यांच्या मदतीसाठी तो गुन्हे करतो आणि पोलीसापासून दडून असतो. ह्या घटनेवरून जरी समाजाच्या दृष्टीने गुन्हेगार दरोडेखोर असणारा "सत्या रामोशी आणि माटे यांनी त्याच्यातील माणूसकीचा घेतलेला शोध थक्क करून सोडतो. वरवर पाहता गुन्हेगार म्हणून पाहणाऱ्या समाजालाही हा माणूसकीने मदत करतो.

माटे यांच्या कथेमध्ये समकालीन मराठी कथेचे गुण दिसत नाहीत. हे साहजिकच आहे. माटे ज्या काळात कथालेखन करीत होते तो काळ फडके-खांडेकरांचा कलावादाचा व ध्येयवादाचा कालखंड होता. माटे यांचा यापेक्षा वेगळा मार्ग आहे. त्यांनी आपले लेखन केले ते माणुसकीचे दर्शन घडविणे आणि उपेक्षितांचे अंतरंग वाचकासमोर सादर करणे. यामुळेच त्यांना या प्रकारची माणसे भेटतात. त्यात पिऱ्यासारखी माणसे दरोडेखोर असुनही त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येता येत नाही. सामाजिक बांधीलकी, पोलीसांचा धोका, दारिद्र्य, उपेक्षा याचे चित्रण करीत असतानाच उपेक्षित समाजाचे भावविश्व आणि त्यांच्या मर्यादा त्यांनी चित्रित केल्या आहेत.

माटे यांच्या कथेतील कथन पद्धतीकडे पाहता वाङ्मयीन अल्पशा काही दोष असेल तरी त्याच्या लेखनातील जातीवंत कळकळ आणि त्यातून दिसणारी त्यांची धडपड यामुळेही काही कथेच्या आशय घनतेवर परिणाम घडतो. माटे हे हाडाचे समाजसुधारक होते.

माटे हे पुण्याच्या सदाशिव पेठेतील लेखक. परंतु फक्त भाषा एवढेच जरी त्यांच्या कथांतून वेगळे केले तर बाकी सर्व अनुभव हे ग्रामीण आणि अस्पृश्य आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील अस्पृश्यतेखाली येणाऱ्या सर्व व्यक्ती गुन्हेगार समाज आणि दारिद्र्याने असह्य झालेल्या व्यक्तीच्या वेदना हेच विषय त्याच्या कथेचे आहेत. तत्कालीन वास्तव जीवनाचे दर्शन त्याच्या कथेमध्ये घडते. सुधारणेची नकळत जाणिव त्यांच्या कथेमधून घडते. शैली दमदार अशी असून निवेदन रसाळपणा त्यांच्या कथेतून घडविते. व्यक्तीच्या दुःखाची सामाजिक मीमांसा ते आपल्या कथांमधून करतात.

एकूणाच माटे यांच्या कथेचा अभ्यास करता आनंद यादव यांचे म्हणाणे यथायोग्य आहे. त्यांना ती "माणासे" म्हणूनच महत्वाची वाटली. या माणासांच्या जीवनाच्या रेषाच इतक्या जोरदार आहेत की, त्यातून सामाजिक अर्थ वगैरे काढणं सहज शक्य होतं. म्हणून त्यांना "ग्रामीण कथेचे हरिभाऊ" म्हटले."त्यांच्या एकूण लेखनाशी ते सुसंगतच होईल असे वाटते." [२] माटे यांनी ग्रामीण कथेला एक पाऊल पुढे नेण्याचे कार्य केले. हे करत असताना माणासाला माणूस म्हणून जोपासण्याची त्यांची वृत्ती आणि वास्तवाशी घातलेली सांगड अधिक लक्ष वेधून घेते. रंजनप्रधानतेच्या कालखंडात जे कार्य हरिभाऊने केले त्यानंतरच्या काळात कलावादाचा गजबजा झालेला असताना अस्सल ग्रामीण वास्तव घडविण्याचे कार्य त्या काळात माटे यांनी केले. म्हणूनच त्यांना"ग्रामीण कथेचे हरिभाऊ" म्हणणे वावगे ठरणार नाही.

ग.ल. ठोकळ :

"सुगी" या जानपद गीताने सर्वांना परिचित असणारे ग.ल. ठोकळ यांनी ग्रामीण कथाही लिहिल्या आहेत. "कडू-साखर" हा

त्यांचा कथासंग्रह आहे. यामध्ये त्यांनी ग्रामीण भागातील अज्ञान, रानदांडगेपणा बरोबरच दादागिरी करणारे लोक आणि परस्परातील वैर याचे चित्रण केले आहे. हे चित्रण करीत असताना त्यातील वास्तवाला कलाटणी देऊन रंजनपरता आणि नाट्यात्मकता यामध्ये त्यांची कथा अधिक रमते. तत्कालीन लघुकथेचा छाप ठोकळ यांच्या कथावर पडला आहे. त्यामुळेच त्यांच्या कथेने कल्पनारम्य आणि रंजनपर घटनेचे दर्शन घडविले आहे. ठोकळांचा खरा पिंड आहे काव्याचा त्यामुळे त्यांच्या कथेमध्ये काव्यात्मता प्रकर्षाने जाणवते. आणि या गुणामुळेच त्यांची कथा वाचनीय झाली आहे. त्यांच्या कथेविषयी आनंद यादव म्हणतात, "माटे यांना ग्रामीण कथेचे हरिभाऊ म्हटले तर ठोकळ यांना फडके म्हणावे लागेल." [३]

## र.वा. दिघे :

ग.ल. ठोकळांच्या काळात कोकणाच्या पार्श्वभूमीवर आधारित अशा प्रसंगावर कथालेखन करणारे कथाकार म्हणून दिघे यांना ओळखले जातात. दिघे यांनी ग्रामीण जीवनातील अनेक विषय आपल्या कथेमध्ये हाताळले आहेत. परंतु त्यामध्ये प्रादेशिकता प्रकर्षाने जाणवते. कोकणाच्या समुद्रकिनाऱ्यावरील कोळी लोकांचे जीवन "वादळ" या कथेमध्ये आले आहे. "लकलकणारे पाणी", "ताजमहल", "लॉटरीचे तिकीट" या कथा कल्पनारम्य आहेत. "भाईंची भाऊबीज" आणि "पहिले बक्षीस" या कथा ग्रामीण जीवनातील दरिद्री परिस्थितीचे वर्णन करणाऱ्या आहेत. या कथांचे आशय ग्रामीण आहेत. तिची निवेदने नागर भाषेत आहेत. विविध विषय हाताळण्याची व्यापकता काही प्रमाणात त्यांच्या कथांमध्ये प्रामुख्याने आढळून येते.

अद्भुतरम्य ग्रामीण कथेचा कालखंड :

माटे यांच्या कालखंडात ग्रामीण कथेला दोन दिशा मिळाल्या होत्या. माटे यांनी वास्तववादी कथा लिहिली. त्याच काळात लघु-कथेचा परिणाम ग्रामीण कथेवर झाला. आणि ग्रामीण कथाही अद्भुतरम्य, मनोरंजनासाठी निर्माण झाली. याच कालखंडातील उदाहरण म्हणून ग.ल. ठोकळ यांची कथा घेतली तर तेच सांगून जाते. म्हणूनच रा.गो. चवरे यांचे मत लक्षात घ्यावे लागते. "काव्यमयतेच्या ओढीने ग.ल. ठोकळांच्या कथा असंभवनीय वाटायला लागतात. एवढेच नव्हे तर, प्रणयविष्कारात नागरपात्रांशी जवळीक साधतात."[४]

चवरे यांचे मताचे प्रत्यंतर ग.ल. ठोकळयांच्या कथांतून आढळते. या काळातील ग्रामीण कथेचा ओघ शहरी अनुकरणाकडे झुकला होता. ग्रामीण कथेच्या आधाराने शहरी वाचकाला करमणूक कशी होईल हे प्रामुख्याने पाहिले जाई. यामुळेच कथालेखनाचा हेतू स्पष्ट होतो.

१९४५ च्या दरम्यान ग्रामीण कथेत बदल घडून आले. यासाठी चिं.म. मराठे, गो.नी. दांडेकर, श्री.ना. पेंडसे, य.गो. जोशी इ. कथाकारांनी कमी अधिक प्रमाणात प्रयत्न केले. चिं. म.मराठे यांचा "गावरान गोष्टी" हया कथासंग्रहात प्रामुख्याने मावळखो-यातील घटना आणि प्रसंग यांचे चित्रण केले आहे. हया कथालेखनावर सदाशिवपेठी ठपका आहे. त्यामुळे या कथेवर पुण्याच्या परिसरचा परिणाम जाणवतो. दत्त रघुनाथ कवठेकर यांनी आपल्या कथेत नागरजीवनाबरोबरच ग्रामीण जीवनातील कौटुंबिक ताण-तणावाचे, दुःखाचे चित्रण ते अधिक करतात. ग्रामीण स्त्रीला कुटुंबात मिळणारी वागणूक, एकत्र कुटुंबात होणारी कुचंबणा त्यांच्या कथांमधून प्रकट झालेली आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून त्यांची "वेडी रकमा ही कथा रकमाची एकत्र कुटुंबात झालेली

कुचंबणा चित्रित केली आहे. या कथेतील रकमाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन आणि तत्कालीन समाजरूढी यांचेही चित्रण येते. हुंडया ऐवजी मुलगीला मुलगा पैसे देत होता. अशी पध्दत होती. रकमाला भोगाव्या लागणाऱ्या व्यथा वेदना कवठेकरांनी सूक्ष्मपणे चित्रित केल्या आहेत.

वामन चोरघडे :

व-हाड प्रांतातील ग्रामीण जीवनांची जाणिव चोरघडयांना होती आणि इतर अनेक, कथेबरोबरच ग्रामीण कथाही लिहिल्या आहेत. "अतिथी देवो भव" ग्रामीन मन आणि रूढी परंपरा किती खोलवर रूजली आहे त्याचे या कथेत चित्रण केले आहे. आपल्याला जगविणारा "बैल" त्याला देव समजले जाते आणि या देवाची पुजा केली जाते. याच बैलाच्या अंगावर डॉक्टर रूपया फेकतो. यामुळे अतिथीचा झालेला अपमान त्या मनाला सहन होत नाही. फेकलेला रूपाया जाळून टाकतो आणि त्यावेळी त्याला झोप लागते. यावरून ग्रामीण मनाची निष्ठा समजून येते. "भाकरीची गोष्ट", "संस्कार" या कथेत बालमनांची स्पंदने चित्रित केली आहेत.

य.गो. जोशी यांनी वास्तव जीवनाचे चित्रण ग्रामीण कथे-मध्ये केले आहे. त्यांच्या कथेचा विकास भावनांचे विविध पदर उलघडत कथापुढे सरकते. जोशी यांनी ग्रामीण सवर्णातील समस्यांचे चित्रण केले आहे. तर म.भा. भोसले यांनी ग्रामीण अस्पृश्य समाजाचे चित्रण केले आहे. त्यामध्ये त्यांनी लहान लहान प्रसंग आदी सूक्ष्मपणे चित्रित केले आहेत. ग्रामीण सुशिक्षित अशा व्यक्तींच्या चित्रणात त्यांची कथा यशस्वी झाली आहे. ती म्हणजे "मुका मार" होय. या कथेतील ग्रामीण भागात अस्पृश्य जातीतील एका शिक्षकाला

आलेला अनुभव बारकाईने टिपला आहे. शाळेतील इतर सवर्ण शिक्षकासमवेत ते जेवणाच्या कार्यक्रमासाठी जातात. जेवताना त्यांची जागा वेगळी असते व स्वतःची पत्रावळी स्वतः उचलून टाकावी लागतेच. परंतु त्या जेवणातील पदार्थ वाटून आपल्या आयुष्यात आपल्याला व आपल्या मुलाबाळांना असले स्वादिष्ट अन्न मिळाले नाही म्हणून राहिलेले जेवण तो शिक्षक पत्रावळीत बांधून बाहेर पडतो. त्याचवेळी उष्टया पत्रावळीच्या ठिकाणी अस्पृश्य समाजातील मुले त्यावर तुटून पडलेली पाहून त्याची आलेली मानसिक अवस्था भोसले यांनी अचूक टिपली आहे. यावरुन त्यांच्या सूक्ष्म आकलनाची कल्पना येते.

स्वातंत्र्यापूर्वीच्या कथेच्या विकासाचा आढावा घेताना कथेतील ग्रामीण जीवनाचा आढावा घेणा-या कथाकारावर गांधीजींच्या "खेडयाकडे चला" या घोषणेचा परिणाम झाला होता. खेडयातील जीवन त्यांनी जवळून पाहिलेले नव्हते आणि त्यामुळेच त्यांच्या कथे-मधून रंजक, अद्भूतरम्य अशा घटनांचा वापर करुन कथा लिहिल्या गेल्या. या कथांना अपवाद म्हणून श्री.म. माटे यांचे नांव दयावे लागते. ग्रामीण जीवनातील त्यांना जरी प्रत्यक्ष अनुभव नसले तरी सुध्दा त्यांनी जे चित्रण आपल्या कथांमधून केले ते त्यांनी आदी जवळून पाहिले होते. त्यामुळेच त्याच्या कथा जीवनातील कारुण्य उलगडू शकल्या. म.मा. भोसले यांनीही ग्रामीण अस्पृश्य समाजातील सुशिक्षित वर्गाची झालेली समाजव्यवस्थेमुळे अवस्था बारकाईने टिपणी आहे. वास्तव जीवन टिपले ते माटे आणि भोसले यांनी. इतर कथालेखकांनी ग्रामीण कथेला अद्भुतरम्यतेकडे नेले आणित्या परीने त्यांनी ग्रामीणकथेच्या विकासात भर घातली. यानंतर ग्रामीण कथा नवकथेच्या रुपाने प्रकट झाली.

## ग्रामीण कथेचे अग्रदूत : व्यंकटेश माडगूळकर

१९४६ सालानंतर मराठी कथावाङ्मयात "नवकथेने" भर घातली. या नवकथेला काही सामाजिक कारणे आहेत. दुस-या महायुध्दाने मानवी जीवमुल्यांची झालेली परवड आणि त्या अनुषंगाने मानवातील झालेला बदल चित्रित केले आहेत. हे जसे मराठी नवकथेने चित्रित केले तसेच चित्रण ग्रामीण भागातील परिस्थिती चित्रण काही प्रमाणात ग्रामीण कथेने केले. नवकथा बहरात असतानाच तो प्रवाह ग्रामीण कथेत आणला तो सर्वप्रथम व्यंकटेश माडगूळकर यानी. माडगूळकरांनी ग्रामीण कथेमध्ये मुल्यात्मक बदल घडवून आणला आहे. माडगूळकरांनी १९४६ साली "वडारवाडीची वस्ती" ही पहिली कथा प्रसिध्द केली आणि त्यानंतर "माणदेशी माणसं" हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. ग्रामीण कथेला लघुकथेच्या तंत्रातून मुक्त करुन कथेवरील बंधने नाकारुन कथेचा स्वतंत्र प्रांत निर्माण केला. जसे आहे तसे चित्रण करुन त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा आघात न होता जसे घडलं तसे ते मांडण्याचा प्रयत्न केला आणि ग्रामीण कथेत जो यशस्वी प्रयोग केला तो खरोखरच ग्रामीण कथेच्या विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरला आहे. माडगूळकरांच्या ग्रामीण कथेविषयी म.द.हातकणंगलेकर म्हणतात, "त्यांनी मराठी ग्रामीण कथेचे आद्य व अभिजात पीठ स्थापन केले. त्यांच्या आोदरच्या पिढीतील माटे, ठोकळ या नामवंत कथाकारांच्या समर्थ कथाकृतीशी तुलना केली तर असे आढळून येते की, व्यंकटेश माडगूळकरांची मराठी ग्रामीण जीवनाची उपजत जाणच इतकी दृढ आणि सहजसखोल होती की त्यासाठी कोणत्याही अन्य व्यासंगाची, करामतीची व धडपडीची त्यांना गरज भासली नाही."[५]

माडगूळकरांनी माणदेशाच्या परिसरातील व्यक्ती, घटना व प्रसंग यांचे चित्रण केले आहे. त्यांच्या कथेमध्ये ग्रामीण जीवन हे वरवरचे

नाही त्यांनी जे पाहिले अनुभवले तेच त्यांनी आपल्या कथांमधून प्रकट केले. "हस्ताचा पाऊस", "उंबरठा", "काळी आई", "जांभळाचे दिवस", "गावाकडच्या गोष्टी" इ. कथासंग्रहातून ग्रामीण संवेदनशील मन प्रकट होते. त्यांच्या कथेतील माणसे ही प्रामुख्याने माणदेशातील आहेत. माणदेशाचा प्रदेश आणि तेथील माणसांचे स्वभाव याचे बारकावे अचूक टिपले आहेत. माणदेशातील दारिद्र्य हे तिथल्या खुरट्या निवडुंगाप्रमाणे तेथील समाजाला डसले आहे. अशा दारिद्री जीवनातही माणसांच्या प्रामाणिकपणाचा त्याच बरोबर बेरकीपणा लबाडपणा, धूर्तपणा इत्यादी गुणांचाही बारकाईने वेध घेतला आहे. त्यांच्या कथेत ग्रामीण समाजातील सर्व घटक येतात गावातील सवर्ण आणि गावकुसाबाहेरील महार, मांग, रामोशी, दरवेशी, एवढेच नव्हे तर जहागीरदारापासून दारिद्र्याने खितपत पडलेल्या सामान्य माणसांना माडगूळकरांनी आपल्या कथेत स्थान दिले आहे. माण-देशाचा संपूर्ण प्रदेश हा कोरडा ठणठणीत आहे. त्यामुळे दुष्काळ हा सतत पाठीशी असतो. या दुष्काळी परिस्थितीचा परिणाम जसा व्यक्तीच्या मनावर पडतो तसाच तो समाजमनावरही पडतो. आपल्याला आलेले दुःख हे नियतीमुळे आले आणि ते आपल्याला भोगले पाहिजे अशी मानसिक भावना तेथील व्यक्तीवर झाली असल्याने मुकाट्याने आलेल्या परिस्थितीशी मिळतेजुळते घेणे एवढाच एक मार्ग त्यांच्या समोर असतो. याचे चित्रण माडगूळकरांच्या कथांमधून जाणवते. या परिस्थितीला शरण जाणारी जशी मने आहेत तसेच परिस्थिती-च्या विरुद्द वागणारी बेरकी, धूर्त, कावेबाज अशीही माणसे माडगूळकरांनी आपल्या कथेमध्ये त्यांच्या गुणादोषासहीत नमूद केली आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेने स्वतःचा असा वेगळा मार्ग स्वीकारला आहे. तो योग्य आणि मार्गदर्शक वाटतो.

कथेसंबंधी जे संकेत होते ते त्यांनी झुगारून दिले. बाह्य घटने-बरोबरच मानवी मनातील जाणिवेला महत्व दिले आणि माणसाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या ग्रामीण कथेविषयी रविंद्र ठाकूर म्हणतात, "माडगूळकरांनी नवकथेला माणदेशी जीवनाचा अस्सल मराठमोळा साज बहाल केला." [६] माडगूळकरांच्या कथांमधून गावकुसाबाहेरील जातीयता कोणाकोणाती रूपे धारण करतात. याचे चित्रणही त्यांच्या "अडिट", "झोंबी", "गोडेपाणी", या कथा पाहता अस्पृश्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण केले आहे. मात्र त्यामध्ये कुठेही उद्वेग नाही की आक्रोश नाही.

ग्रामीण जीवनात शेतीव्यवसायाबरोबरच समाजात रंग भरणारे चोर, दरोडेखोर, दरवेशी, त्याच प्रमाणे ग्रामीण जीवनाशी निगडीत असलेल्या जनावरांनाही त्यांनी आपल्या कथेत स्थान दिले आहे. जरी व्यक्ती आणि समुह यांचाही उल्लेख त्यांच्या कथेमध्ये आढळतो. त्यांच्या कथे विषयी नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "माडगूळकरांच्या कथेमधून पुष्कळदा माहितीवजा तपशील येतो आणि नाट्यात्मक मांडणीही महत्वाची वाटते. त्यामुळेच मनोविश्लेषणावर त्यांचा अतिरिक्त भर नसतो." [७] अशा प्रकारे माडगूळकरांनी अस्सल ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कथा लिहून ग्रामीण कथेच्या विकासात मोलाची भर घातली म्हणून त्यांनी बिन्नीचे ग्रामीण कथाकार म्हणून ओळखले जाते.

शंकर पाटील :

व्यंकटेश मागडगूळकरांच्या बरोबरीच्या काळातच शंकर पाटील यांनी कथालेखनास सुरुवात केली. १९४९ साली "रामाच्या पाऱ्यामंदी" ही त्यांची पहिली ग्रामीण कथा प्रसिध्द झाली. त्यानंतर १९५८

साली "क्लीव" हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. त्यानंतर अलिकडील १९८२ मध्ये प्रसिध्द झालेला "शांकर कथा" हया कथासंग्रहापर्यंत त्यांनी ग्रामीण कथेमध्ये भर घातली. त्यांनी आपल्या कथेमध्ये प्रामुख्याने ग्रामीण माणसांच्या संसाराचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे कुटुंबातील जाती गोती याचबरोबर ग्रामीण स्त्रीच्या मनाचा शोध त्यांनी आपल्या कथांमधून घेतला आहे. त्यांच्या कथा प्रामुख्याने शेतकरी जीवन व त्यातील विविध दु:खाचे वेध घेणा-या कथा आहेत. शंकर पाटील यांच्या बहुतेक कथा हया स्त्रि-यांच्या दु:खावर भर देणा-या आहेत. हेच त्यांच्या कथांचे वेगळेपण सांगता येईल.

शंकर पाटील यांच्या कथांमधून ग्रामीण कथेच्या नव्या पर्वाची सुरुवात झालेली दिसून येते. त्यामध्ये त्यांच्या काही विनोदी कथांचा भाग वेगळा केला तर बाकी सर्व कथा या ग्रामीण माणसाच्या दु:खाचा आणि कुटुंबातील व्यक्तींच्या मनाचा वेध घेतला आहे. माडगूळकरांच्या कथेतील माणसाप्रमाणे शंकर पाटील यांच्या कथेतील ग्रामीण माणूस आपल्या वाटयाला आलेले दु:ख निमुटपणे सहन करताना दिसतो. त्या-विरुध्द तो कधी तक्रार करीत नाही की पेटून उठत नाही. नियतीच्या अपार दु:खाने त्यांच्यामध्ये प्रतिकार करण्याची जणू क्षमताच नसल्याचे जाणवते आणि आपल्या वाटयाचे दु:ख सोसणे एवढेच त्यांना माहित आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या दशकामध्ये शिक्षणाचा लाभ ग्रामीण भागातील तरुणांना काही प्रमाणात मिळाला. १९६५-७० पर्यंत जेमतेम शिक्षण मिळालेल्या व नंतरची पुढची पिढी काही प्रमाणात विद्यापीठिय शिक्षण घेऊ लागली. अनेकजण शहरामध्ये जाऊन

पांढरपेशा नोकऱ्या मिळवू शकलो. काही सरकारी नोकरीत गेले, काही अध्यापन क्षेत्रातील अध्यापक, महाविद्यालयात अध्यापक म्हणून काम करू लागले. एकंदर ग्रामीण लोकसंख्येच्या मानाने हे प्रमाण फार मोठे नसले तरी लक्षणीय निश्चितीच होते. विद्यापीठीय शिक्षण घेतलेला वर्ग "ग्रामीण साहित्य" सारख्या चळवळीत पडून समकालीन बदललेल्या ग्रामीण जीवन जाणिवेचे वास्तवाचे वेध घेवून नवी पिढी ग्रामीण कथेच्या क्षेत्रात निर्मितीसाठी या लेखकाच्या पाठीशी ग्रामीण जीवनातील विविध स्वरूपाचे अनुभव, ग्रामीण जीवनातील अंतर्गत ताणा-तणाव, आधुनिक काळातील शहरीपणाचा झालेला परिणाम, यंत्र संस्कृतीमुळे, औद्योगिक करणाने व सहकार क्षेत्रामुळे ढवळून निघालेला ग्रामीण परिसर इ. समकालीन ग्रामीण जीवन वास्तव मांडण्याचा प्रयत्न १९६० नंतर ग्रामीण कथाकारांनी केलेला आहे.

ग्रामीण साहित्यात या काळात महत्वाची भूमिका घेतली ती म्हणजे ग्रामीण साहित्य ग्रामीण बोलीत आले पाहिजे आणि यासाठी ग्रामीण कथेच्या क्षेत्रातही काही ग्रामीण कथाकारांनी जाणिवपूर्वक बदल घडवून आणला. ग्रामीण भागातील राजकारण आणि धार्मिक भावना त्याचप्रमाणे परंपरागत चालत आलेल्या रूढी आणि बदलत्या समाज जीवनात माणसांची जगण्यासाठी चाललेली धडपड याचेही चित्रण १९७० नंतरच्या कथाकारांनी केलेले आहे.

द.मा. मिरासदार :

ग्रामीण विनोदी कथेची सुरुवात मिरासदारांनी केली असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. कारण १९४६ साली "माझ्या बापाची पेंड" ह्या पहिल्या कथासंग्रहापासून काही अपवादात्मकच कथा सोडल्या तर सर्व कथा

हया विनोदी आहेत. "विरंगुळा", "स्पर्श", "भुताचा जन्म" हे त्यांचे प्रसिध्द विनोदी कथासंग्रह, व्यक्ती, घटना प्रसंग व कथानक हयांच्या मर्यादित विनोद निर्माण करणे हे अवघडच. परंतु याचा योग्य संयोग साधून मिरासदारांनी जो विनोद ग्रामीण कथेत साधला तो आतापर्यंतच्या ग्रामीण कथालेखकांना जमलेला नाही हे तितकेच खरे आहे. त्यांच्या कथेतील विनोद हा व्यक्तीच्या स्वभाव व प्रसंगावर आधारलेला असतो.

विक्षिप्त, नादिष्ट धुर्त, कावेबाज, इरसाल, बढाईखोर, भित्रट, ही त्यांची कथापात्रे गुन्हे, खटले, साक्षी, फसवणूक हे त्यांचे कथाविषय असल्याने त्याच्या कथेत रंजकतेबरोबरच विनोद निर्माण होतो. ग्रामीण जीवनाशी दारिद्र्याशी नाते सांगणारा त्यांचा ("विरंगुळा" हा कथासंग्रह निखळ ग्रामीणतेचे दर्शन घडविणारा आहे.

## रणजीत देसाई :

१९५२ पासून ते १९६५ पर्यंतच देसाई यांचे कथासंग्रह पाहिल्यास असे दिसून येते की, ग्रामीण कथेत स्वतःचे असे खास वैशिष्ट त्यांनी निर्माण केले नाही. त्यांच्या "रुपमहाल", "मधुमती", "कणाव", "जोश" "वैशाख", "कातळ" इ. कथासंग्रहात त्यांनी कोल्हापूर व त्याच्या आसपासचा परिसर चित्रित केलेला आहे. "रूप्याचे डोळे" व "चाकोरी" या कथा देसाई यांची कथा ग्रामीण परंतु शहरी वर्णन आणि संगीत यांची पार्श्वभूमी असलेली अशी आहे. त्याच बरोबर वैभवाचा झोक दाखविणारे पाटील-जमीनदार, परस्परांच्या सुखाचा आणि संपत्तीचा हेवा करणारे लोक इत्यादींची चित्रणे त्यांच्या कथेत येतात.

मराठी नवकथेच्या समृध्दीत जडणघडणीत ज्यांचा वाटा आहे, त्यात काही ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारेही लेखक आहेत, व्यंकटेश

माडगूळकर, शंकर पाटील, रणजीत देसाई, द.मा. मिरासदार हे १९६० पर्यंत लेखन करू लागलेले पहिल्या दमाचे ग्रामीण कथाकार. या सगळ्याच लेखकांनी आपल्या परीने ग्रामीण जीवन मराठी कथेत आणले. ग्रामीण जीवनाच्या बाहय वास्तवाबरोबरच ग्रामीण माणसाच्या मनाचे ही चित्रण केले गेले आहे.

आनंद यादव :

ग्रामीण जीवन आणि त्या जीवनातील एकंदर वास्तव अनुभव असलेले संवेदनशील मनाचा ग्रामीण कथालेखक म्हणून आनंद यादवांना ओळखले जाते. कागल आणि त्या परिसरातील ग्रामजीवन त्यांच्या कथामधून आले आहे. खेड्यातील बदलत चाललेले जीवन व बाहय परिवर्तन याचा सुक्ष्म अभ्यास त्यांना आहे. याची जाणिव त्यांच्या कथांमधून दिसून येते. १९६३ पासून सातत्याने आनंद यादव याचे कथालेखन सुरु आहे. "खळाळ", "उखडलेलो झाडे", "डवरणी" हे कथासंग्रह आहेत. तर "घरजावई" आणि "माळावरची मैना" हे विनोदी कथासंग्रह आहेत.

"उखडलेली झाडे" या ग्रामीण कथासंग्रहातील कथा या ग्रामीण भागातही येऊ घातलेल्या यंत्रसंस्कृतीच्या आक्रमणामुळे झालेली कृषीसंस्कृतीची अवस्था आणित्याच बरोबर पारंपारिक चालत आलेल्या व्यवसायावर यामुळे झालेला परिणाम याचे चित्रण या कथासंग्रहात केले आहे. "शेवटचं पायतान", "कष्टाची लक्ष्मी" या कथेमध्ये पारंपारिक व्यवसायावर झालेला परिणाम दाखविला आहे. त्यामुळे हताश झालेला ग्रामीण पारंपारिक उद्योग करणारा माणूस याचे चित्रण केले आहे. "खळाळ" या कथासंग्रहात शेत मजूर आणि त्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या घटनांचा वेध घेतला आहे. त्यामध्ये त्यांनी अस्सल ग्रामीण बोलीचा वापर केल्याने ग्रामीण माणूस त्याच्या गुणदोषासह प्रकट झाला आहे.

त्या माणसांबरोबर कृषीजीवनाचा परिचय ही त्यांच्या कथांमधून होतो आणि यामुळे त्यांच्या त्यांच्या कथा अस्सल ग्रामीण कथा वाटतात. त्याच बरोबर ग्रामीण जीवनाचे सखोल दर्शन त्याच्या कथामधून घडते. ग्रामीण दुःखाचा आणि दारिद्र्याचा वेध घेणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत. यादवांच्या कथालेखनाचे तंत्र आणि माडगूळकरांच्या कथांचे तंत्र यात काही प्रमाणात साम्य आढळून येते. माणदेशी माणूस जसा आहे तसा चित्रित करण्याचा प्रयत्न माडगूळकरांनी केला. त्याचप्रमाणे कागलकडील शेत जीवनाशी असा ग्रामीण दारिद्र्याखाली भरडलेला माणूस यादवांनी त्यांच्या गुणदोषासहित अवतरला आहे.

कथा निवेदनासाठी बोली भाषेचा वापर करून यादवांनी ग्रामीण कथेला जीवंतपणा बहाल केला. बोलीमुळे वाटणारा दुरावा नाहीसा केला. त्यादृष्टीने "धुणं", "वखार", "गाळ", यासारख्या अस्सल ग्रामीणतेशी नातं सांगणाऱ्या कथा आहेत. "मोट" सारखी कथाही परिणामकारक झाली आहे हे दिसून येते. आनंद यादव यांच्या एकंदर कथावाङ्मयाविषयी कानडे म्हणतात, "त्यांच्या लेखनीने काव्यात्मता बहाल केली. (खळाळ), पुरोगामी सामाजिक आशय प्रधान केला (उखडलेली झाडे) आणि सर्जनशीलतेचा विविध अंगांनी कलात्मकतेने वेध घेतला (आदिताल) कथा हा वाङ्मयप्रकार त्यांनी समर्थपणे हाताळला. पण ही कथा गुणसंपन्न असूनही संख्येने विपुल नाही. त्यांनी सातत्याने कथालेखन केले असते तर मराठी कथा साहित्यात त्यांना खचितच श्रेष्ठ दर्जाचे स्थान लाभले असते. [८]

"खळाळ", "उखडलेली झाडे" या कथासंग्रहातील त्यांच्या कथा या ग्रामीण जीवनाशी नाते सांगणाऱ्या आहेत. त्याच बरोबर ग्रामीण जीवनात आलेले राजकारण व त्याचा ग्रामीण जीवनावर

झालेला परिणाम याचा वेध देणे याहीपेक्षा कथा ही शेतकरी जीवनातील निगडीत अशीच आहे. त्यांच्या कथांमध्ये शेतक-यापेक्षा शेतमजुरांच्या जीवनाच्या व्यथा वेदनांचा वेध त्यांनी आपल्या कथेत घेतला आहे.

रा. रं. बोराडे :

१९५७ मध्ये "वसुली" ही ग्रामीण कथा लिहिणारे लेखक म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. त्यांचा १९६२ साली "पेरणी" हा ग्रामीण कथासंग्रह प्रसिद्ध झाला. यामध्ये त्यांचे असलेले त्या मातीवरील आणि त्या मातीतल्या माणसावर किती जीवापाड प्रेम आहे हे दिसून येते. त्याच बरोबर "ताळमेळ", "वानमळा", "मळणी" हया कथासंग्रहातून मराठवाडयातील ग्रामीण जीवन त्यांनी त्यामध्ये अचुक टिपले आहे.

त्यांच्या सुरवातीच्या कथांवर समकालीन कथाकार, माडगूळकर, शंकर पाटील, मिरासदार या कथालेखकांचा अनुकरणाचा काही भाग सोडला तर बोराडे यांनी आपली स्वत:ची अशी खास कथाबीजे त्यांच्या "पेरणीपासून""मळणी" पर्यंतचा त्यांच्या कथालेखनाचा आढावा लक्षात घेतल्यास त्यात जाणवतात. त्यामध्ये बोराडे यांनी ग्रामीण समाजातल्या संबंध व त्यासंबंधातून निर्माण होणारे ताण-तणाव याचे चित्रण केले आहे. नागनाथ कोत्तापले म्हणतात, "ग्रामीण समाजातील नाती-गोती विशेषत: ग्रामीण समाजातील नात्यागोत्याचे संबंध व या संबंधांतून निर्माण होणारे ताण-तणाव माझ्या कथांमधून आलेले आहेत. शिवाय ग्रामीण समाजातील स्त्रीयांच्या जीवनातील विविध स्वरुपाची दु:खे स्वाभाविकपणे माझ्या कथांमधून आलेले आहेत. विशेषत:

"बोळवण" हा संपूर्ण कथासंग्रह स्त्री दुःखाच्या संदर्भात अभ्यासण्याजोगा आहे. माझ्या कथा लेखनाचा आणखी एक विशेष असा की, खेड्यातील बालमनाची मनोरचना आणि त्याला म्हणून जाणवणारे खेड्यातील विश्व हे माझ्या कथेचे विषय बनले आहेत. उदा. "भेग", "मळणी", "खेळ" इ. कथांतून दिसून येईल." [१] कोतापल्ले यांनी मांडलेल्या वरील विवेचनातून रा. रं. बोराडे यांच्या कथांचे विशेष लक्षात घेतात.

ग्रामीण कथेमध्ये पुन्हा नवीन वळण निर्माण झाले ते १९६० नंतर निर्माण झालेल्या दलित साहित्य प्रवाहामुळे. ग्रामीण कथेमध्ये गावकुसाबाहेरील चित्रण आणि समाजव्यवस्था यांचे चित्रण करणारी म्हणून दलित कथाकारांचा थोडक्यात आढावा घेणे येथे क्रमप्राप्त ठरते. दलित जीवनाचे प्रत्यक्ष अनुभव नसलेले लेखकांनी दलित जीवन चित्रित केले आहेत. त्यामध्ये माटे, माडगूळकर यांचा समावेश केला जातो.

गावकुसाबाहेरील ज्या लेखकांनी जीवन अनुभवले ते दुःख ज्यांनी जीवनात प्रत्यक्ष अनुभवले अशा अस्पृश्यतेचे दुःख मांडणारे लेखक यांनीही आपल्या परीने ग्रामीण उपेक्षित समाजाचे चित्रण केले आहे. त्यांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे.

आण्णाभाऊ साठे : १९४७ च्या आसपास म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडात आण्णाभाऊंनी कथालेखनास सुरुवात केली. त्यांनी आपल्या कथामध्ये वारणाकाठच्या आजूबाजूच्या परिसरातील व्यक्तीच्या जीवनातील प्रसंगावर कथालेखन केले. आण्णाभाऊंची जीवनावर श्रध्दा होती आणि या श्रध्देच्यापोटी त्यांनी इतरांनाही जगण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या मते पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर उभी नसून ती दलितांच्या तळहातावर पेलली आहे. अशा दलित मानसांच्या

रंग रूप गुणा अवगुणासहीत आण्णाभाऊंनी आपल्या कथेत आणले आहे. ग्रामीण जीवनातील ही माणसे संघर्ष करीत असतात. आणि त्यापासून ती कधीही माघार घेत नाहीत. आणि यामुळे त्यांच्या जीवनाची झालेली वाताहात "फरारी" या कथेत प्रत्ययकारी झाली आहेत. त्याच प्रमाणे गावासाठी स्वतःच्या प्राणाचीही तमा न बाळगणारा व गावच्या रक्षणासाठी प्राण गमावतो याच रामणाकाच्या वंशजांना उष्ट्या पत्रावळ्यावरच समाधान मानावे लागते.

आण्णाभाऊ साठे यांच्या कथा प्रखर वास्तवाशी जवळीक साधणाऱ्या आहेत. मुलतः त्याचे लिखाण समाजवादी प्रेरणेणे लिहिले आहे. त्याच्या कथेतील माणसे ही साहसी आहेत. दारिद्र्य व अस्पृश्य अपमानाचे जीवन यामुळे वैतागलेली आहेत. त्यामुळे अन्नासाठी चोऱ्याही करताना दिसतात. आण्णाभाऊंच्या कथेविषयी प्रकाश कुंभार म्हणतात, "ग्रामीण भागातील अस्पृश्यांच्या जीवनातील काही समस्यांचे चित्रण बऱ्याचशा कथांतून येते." [१०] ग्रामीण दलितांबरोबरच गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या व्यक्तीचे चित्रण त्यांच्या कथांत आढळते.

शंकरराव खरात :

शंकरराव खरातांनी आपल्या सुरुवातीच्या कथात आपण पाहिलेले अनुभवलेले दलित जीवन चित्रित केले आहे. त्यांच्या "बारा बलुतेदार" आणि "तडीपार" या कथासंग्रहातील कथा ह्या ग्रामीण समाजाचे स्तराचे चित्रण करतात. त्यामध्ये विविधता आढळते. मात्र "सांगावा" आणि "टिटवीचा फेरा" या कथासंग्रहातील कथा या ग्रामीण भागातील अस्पृश्य समाजाचे जीवन किती असहय आहे याचे

दर्शन हया कथासंग्रहातील कथांमधून घडते. "दौंडी" ही रामा तराळाच्या उपेक्षित जीवनाची व्यथा आहे. असे म्हणावे लागेल. रामाच्या जीवनाचा आणि त्याला मिळणा-या गावकीच्या कामाचा मोबदला शून्य आहे.

<u>चास्ता सागर :</u>

१९६० नंतरच्या ग्रामीण कथावाङ्मयात महत्वाची भूमिका बजावणारे कथालेखक म्हणून चास्ता सागर यांचा उल्लेख केला जातो. काही प्रमाणात "नागीण" कथासंग्रहाने प्रसिध्द असलेले "नागीण" वाले चास्ता सागर अशी पटकन ज्यांची आठवण होते असे ग्रामीण कथालेखक आहेत. त्यांच्या कथालेखनाचे विशेष म्हणजे त्यांनी ग्रामीण भागातील भटक्या, विमुक्त, जातीतील लोकांचे जीवन चित्रित केले आहे. त्यांच्या "मामाचा वाडा", "नागीण" या कथासंग्रहातील कथांनी चोखंदळ वाचकांचे व समीक्षकांचे मन वेधून घेतले आहे.

सागर यांची "नागीण" ही कथा उत्कृष्ठ कथा म्हणून त्यांचा लौकिकास पात्र ठरली आहे. त्यांनी चित्रित केलेले एकंदर नाट्यमय चित्रण त्यांच्या कथालेखनाचे कौशल्य दाखवते. त्यांच्या कथेतील एकंदर मांडणी व त्यातील काही अवास्तव घटना क्वचित अतिरंजित वाटते. आणि त्यातील भ्रम यासारखे चित्रण पाहता एकंदरच बापूची मनाची अवस्था दाखविली ती काही पहाण्यासारखी आहे. या ठिकाणी नागीण ही सारखी दिसणे आणि तीची वाटणारी भिती यामुळे कथेला वेगळे रुप धारण करते. नागाला ठार मारल्यानंतर शेवटी राहते ती नागीण यामुळे मनात भितीचे वातावरण निर्माण होते. याचा धक्का चंद्राला बसतो आणि ती नागीण चंद्राला दंश करते.

एवढेच कथानक जरी असले तरी कथेच्या सुरुवातीपासूनच हुरहुर लागल्या-सारखी तन्मयतेची रचना करण्यास सागर यांना यश मिळाले आहे. कथेची गती तेवढयाच पध्दतीने पुढे सरकते. नागीणा कथेतील बापू आणि चंद्रा यांची मानसिक अवस्था बापूने नागाला मारल्यावर चंद्राची झालेली मानसिक कुचंबणा याचेही चित्रण सागरांनी केले आहे. त्याच बरोबर "दर्शन" या कथेमध्ये पुतळाबाईची व्यक्तिरेखा उभारण्याचे कौशल्य थक्कीत करणारे आहे. पुतळा ही देवाच्या सेवेसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातलेली असते. देवाच्या नावाखाली तिला भोगाव्या लागणाऱ्या यातना सागरांनी अचूक टिपल्या आहेत. पुतळाच्या देवाबरोबर लग्न लागण्याच्या समारंभापासून तिला आलेले अनुभव आणि उभ्या आयुष्यात सोसाव्या लागणाऱ्या वेदनांचा आलेख समोर उभा केला आहे. जोगतीणीच्या आयुष्याचे हे अंत:करणाला वेध घेते. या दर्शनाला दु:खाची साथ आहे. त्यामुळे हे दु:ख गहिरे आहे. जोग-तीणीचे होरपळणारे आयुष्य अजूनही समाजपरंपरेला विरोध करता येत नाही. म्हणून स्वत: ज्या वेदना सहन केल्या त्याच वेदनेत स्वत:च्या मुलीला ढकलले जाते. या अस्पृश्य जाण्याला काही समाजात अर्थच राहिलेला नसतो. कथा उत्कट प्रसंग रंगविण्यात चास्ता सागर यशस्वी झाले आहेत. त्यांच्या कथे विषयी मुलोट यांनी मांडलेले मत पुढील प्रमाणे, "वास्तविक त्यांच्या कथांचे विषय ग्रामीण जीवनाशी निगडीत असे व वैविध्यपूर्ण असतात, परंतु कथेची मांडणी करत असताना ते स्वत:च हरवून जातात आणि मुख्य विषयाकडे व आशयाकडेही त्यांचे दुर्लक्ष होत जाते. कथावस्तूत ढिसूळपणा येऊन कथेच्या शेवटासाठी भरकटत जातात."[१२]

भाऊ मांडवकर :

ग्रामीण कथेच्या वाटचालीत वैदर्भीय ग्रामीण कथाकारांनी जी

आपली भूमिका बजावली त्यामध्ये भाऊ मांडवकर यांचाही वाटा आहे. त्यांचा "भैरी" (१९६०) साली प्रसिद्ध झाला. त्यातील एक-दोन कथा अपवाद सोडल्या तर सर्व कथा या वैदर्भीय ग्रामीण कथेशी नाते जोडणाऱ्या आहेत. आनंद यादव यांच्या प्रमाणे बोली भाषेचा वापर कथेमध्ये त्यांनी केलेला आहे. त्यामुळे तेथील सर्व वैशिष्ट्यांसह त्यांची कथा प्रकट होते. कष्टकरी जीवनाच्या व्यथा-वेदना यांना त्यांनी आपल्या कथेमध्ये महत्व दिले आहे. वास्तवाशी जवळीक साधण्याचा त्यांचा प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाला आहे. १९६६ साली त्यांचा "कानचिरी" हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. या कथामधून त्यांनी अस्सल ग्रामीणतेची नमुना प्रकट केला आहे. त्याच्या कथामधून ग्रामीण माणूस बोलू लागला असे म्हटल्यास ते वावगे ठरु नये.

रंगराव बापू पाटील :

"न्हावर" हा कथासंग्रह,"बुगडी" या कथेतून प्रकट झालेले ग्रामीण स्त्री मनातील प्रेम व सामाजिक जबाबदारीमुळे वाटणारी भीती याचा योग्य संगम रंगराव पाटील यांनी कथेमध्ये घातला आहे. लग्नानंतरच्या बदललेल्या भावनेचे चित्रण आणि त्यामुळे बापूच्या मनाची झालेली अवस्था अचूक टिपली आहे. "अभ्यास" या कथेतून लहान मुलांच्या कल्पनारम्यतेतून उद्भवलेले गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याच बरोबर मनोविश्लेषण, त्यांच्या कथेतून विविध प्रवृत्तीची स्वभावधर्माची त्यांना सुक्ष्म जाणिव असल्याचे त्यांच्या कथेतून दिसते.

सखा कलाल :

आनंद यादवांच्या बरोबरीच्या काळात सखा कलाल यांनी ग्रामीण कथा लिहिण्यास सुरुवात केली. त्यांचा "ढग" हा कथासंग्रह जरी १९७४

साली प्रकाशित झाला असला तरी त्यांनी १९५९-६० पासून कथा-लेखनास सुरुवात केली होती. त्यानंतर १९८१ साली त्यांचा "सांज" हा कथा संग्रह प्रकाशित झाला. कलालांनी ग्रामीण कथेत दोनच कथा-संग्रह लिहिले. परंतु जे दोन कथासंग्रह लिहिले ते अगदी उत्तम दर्जाचे ग्रामीण कथाकार साजेस असे आहेत. त्यांचा कथालेखनाचा वेग जरी मंद असला तरी आशय अभिव्यक्तीने ते श्रेष्ठ आहे.

कलालांनी ग्रामीण जीवनातील व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातले सुख दुःखाचे प्रसंग आपल्या कथेत चित्रित केले आहेत. म्हणून त्यांच्या कथा ह्या संसार कथा झाल्या आहेत. त्यांच्या "ढग" आणि "सांज" ह्या कथासंग्रहात सर्वसामान्यांची दुःखे ही वरवरची वाटतात. परंतु ती वरवरची नसून त्यांना आतून पाहिले तर शरीर पोखरून, सोडण्याची ताकद त्यांच्या कथेत आहे, हे जाणवते. "ढग" ह्या कथेतील चित्रण ह्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे वाटते. निसर्ग आणि ग्रामीण माणूस यांचे अत्यंत जवळीकतेचे नाते असते. निसर्गाशिवाय त्याला जगणे अशक्य होईल. त्यामुळेच त्यांच्या कथांत निसर्ग प्रतिमांचा उपयोगकेला आहे. "ढग" ह्या कथासंग्रहाच्या नावावरूनच लक्षात येते. माणसाच्या वाढीचा जसा आलेख काढावा तसा आलेख कलाल आपल्या कथेत काढतात. कारण कलालांनी मनुष्याच्या बाल, किशोर, पौगंड आणि प्रौढ मनाचे चित्रण आपल्याकथेत केले आहे. सगा कलालांच्या लेखनामागील महत्वाची प्रेरणा म्हणजे खेड्यातील जीवन, दारिद्र्य, यांची त्यांना जाणिव होती आणि या जाणिवेतूनच त्यांच्या कथा साकारल्या. त्यांचे कथालेखन कमी असले तरी चांगल्या दर्जाचे ठरले आहे.

<u>मधु मंगेश कर्णिक :</u>

कोकणाच्या पार्श्वभूमीवर कथा लेखन करणारे कथाकार म्हणून त्यांचा विशेष उल्लेख केला जातो. निसर्गाच्या रुपाने येणारी नियती,

तेथील माणसांचा भाबडेपणा, श्रध्दा आणि त्यांच्या समस्या यांचे चित्रण त्यांच्या कथेमध्ये आढळते. त्याच प्रमाणे कोकणातील सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले भजनी मंडळी आणि दशावतारी मंडळी यांच्याही जीवनातील प्रसंग त्यांच्या कथेमधून येतात. मुंबईहून आलेली चाकरमनी मंडळी आहेत. त्या मंडळीच्या मुंबईच्या आलेल्या व्यक्तींच्या लकबी त्यांच्या चित्रणात आढळतात. त्याचे प्रमाणे त्यांच्या कथेमध्ये कोकणाच्या निसर्गाबरोबर कोकणातील सांस्कृतिक पार्श्वभूमीचे चित्रण आढळते. त्यांच्या कथेत अनेक स्वभावाची माणसे भेटतात. "वाट", "शाप" या कथेमध्ये खोतासारखी जिद्दी माणसे भेटतात. तसेच अंध-श्रध्दा जोपासणारी लोकही आढळतात. कोकणातील माणसे अतीव दुःखाने ती खचून न जाता पुन्हा धीराने कशी उभी राहतात याचेही चित्रण त्यांच्या कथामधून येते.

महादेव मोरे :

यांच्या कथा एका आगळ्या जीवनाचे दर्शन घडवितात. निपाणी-च्या आसपासचे तंबाखु व्यवसायातील कामगार, टॅक्सी व ट्रक ड्रायव्हर, क्लीनर, मालक, एजंट, जोगतिनी, डोंबारी, दरवेशी अशा कितीतरी उपेक्षितांच्या दुर्लक्षितांच्या आयुष्याची कर्मकहाणी मराठी ग्रामीण कथेत प्रथमच आणाली. भेदक जीवन दर्शन हे त्यांच्या कथांचे खास वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कथा या नागर आणि ग्रामीण माणसांच्या सीमेवरच्या आहेत. त्या ख-या अर्थाने शोषितांच्या कथा झाल्या आहेत. शोष-णाची विविध रुपे ती साकार करतात. त्यांची माणसे दुःख सोशिकतेने भोगत असतात. ही माणसे दुःखाच्या कारणापर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे ही सर्व माणसे क्रियाशील आहेत. पण गतीहीन जीवन

जगणारी आहेत. दारिद्री व अशिक्षित स्त्रियांच्या जीवनात होणारी घुसमट ते प्रभावीपणे मांडतात.

किसन चोपडे :

"तपासणी" या कथासंग्रहानी काही कथांमधून किसन चोपडे यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण त्यांनी केलेले आहे. बदलत्या जाणिवेबरोबरच ग्रामीण मानसातील बदलत चाललेल्या भावनिक जीवनाचे चित्रण करतात. "अश्रुंची साक्ष" ही त्यांची ग्रामीण परिसरातील वेगळ्या वळणाची कथा आहे. यामध्ये प्रणयविष्कार करणारी घटना चित्रित केलेली आहे. "तपासणी" या कथेत ग्रामीण भागातील सरपंचाचे व्यक्तिमत्व रेखाटले आहे. त्यामध्ये सरपंचाच्या दुभंगलेल्या मन:स्थितीचे वर्णन केलेले आहे. त्याच प्रमाणे आ.क. कुरुंदवाडे, "रक्ताचं नातं", हा कथासंग्रह लिहून ग्रामीण कथाकारामध्ये आपली उपस्थिती दर्शविली आहे. या कथासंग्रहातील कथा कृषी जीवनात घडलेल्या घटनांचा तपशिल रूपाने वर्णन करतात. त्यामध्ये "वंशाचा दिवा", "शक्कल" या सारख्या कथा अस्सल ग्रामीणातेशी जवळीक साधतात.

बाबा पाटील :

"एकूर" या ग्रामीण कथासंग्रहाने प्रसिध्द असलेले ग्रामीण कथाकार आहेत. त्यांना काहीवेळा "एकूरकार पाटील" असेही संबोधले जाते. कृषी संस्कृतीच्या अनुषंगाने माणसावर ओढवलेले संकट त्यांनी "एकूर" या कथेत प्रभावीपणे मांडले आहे. त्याच प्रमाणे "शहरातील काम",

"रांजन", "सहभोजन" या कथा ग्रामीणाता जोपासताना दिसतात. त्याच बरोबर वास्तवाची जाणिव त्याचबरोबर श्रध्दा आणि वासना या सश्रध्द मनात निर्माण होणारे वादळ ते ताकदीने रेखाटतात. त्याच बरोबर त्यांच्या कथेतील माणसे परिस्थितीला शरण जाणारी आहेत. जीवनातील करुण, गंभीर आणि शृंगारीक कथा लिहून काही प्रमाणांत लघुकथेकडे झुकलेले त्यांचे लिखाण दिसते.

उध्दव शेळके :
---------

विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चित्र शेळके यांच्या कथांत दिसते. माडगूळकरांच्या पात्रांप्रमाणे तेथील माणसे अडाणी, दरिद्री अशी आहेत, आणि या मानसांविषयी शेळके यांच्या मनात खोल सहानुभूती आहे. या सहानुभुतीतूनच त्यांनी १९५८ पासून ग्रामीण कथेबरोबरच काही विनोदी कथा लिहिल्या त्यामात्र तुरळक आहेत. त्यात "वानगी" हा अस्सल ग्रामीण कथासंग्रह आहे. त्यात त्यांनी विदर्भातील ग्रामीण बोलीचा वापर केला आहे.

ग्रामीण जीवनातील अनेक प्रसंगांचे वर्णन त्यांच्या कथेत येतात. समाजातील ज्या विविध स्तरांतील लोकांचे जीवन त्यांनी चित्रित केले आहे - नव-याचा मार खाऊनही उलट न बोलता त्याच्या नवरेपणाला भिणारी स्त्री, "आसरा" या कथेत चित्रित केली आहे. त्यांच्या कथेत प्रथमपुरुषी निवेदन पध्दत आढळते. शेळके यांच्या कथांचे वाचन केल्यास ग्रामीण जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन गंभीर आहे. असे दिसून येते. बदलत्या ग्रामीण जीवनाची जाणीव त्यांच्या कथे-मध्ये दिसून येते. त्यांनी व-हाडी बोलीचायोग्य वापर आपल्या कथेत केला आहे.

"वैदर्भी बोलीचा समर्थ वापर करणारे लेखक म्हणूनही आपणास त्यांची नोंद करावी लागते. म्हणजे विदर्भात जन्मलेले आणि वाढलेले उद्धव शेळके जेव्हा लेखन करतात तेव्हा, त्यांच्या वाङ्मयातून विदर्भातल्या ग्रामीण मनाचेच चित्रण होत आहे असे म्हणावे लागते." [१३] हे नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत योग्य वाटते.

उद्धव शेळके यांच्या पाठोपाठ वैदर्भीय ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे कथालेखक म्हणजे मनोहर तल्हार. यांनी पहिला कथासंग्रह लिहिला तो "बुढीचं खाटलं". तो १९५८ मध्ये म्हणजे शेळके यांच्या बरोबरीच्याच काळात प्रसिद्ध झाला. त्यांच्या कथालेखनातील आणि शेळके यांच्या कथालेखनातील महत्वाचा जाणवणारा बदल म्हणजे मनोहर तल्हार यांनी आपल्या कथांत बदलत्या खेड्या बरोबरच तेथील व्यक्तिमत्वाचा झालेला बदल अचुक टिपला आहे. "गोरीमोरी" (१९६६), "निसर्ग" (१९७८) हया कथासंग्रहात निव्वळ खेड्यांचे जीवन चित्रित झालेले नाही. त्यांनी "गोरीमोरी" या कथासंग्रहात शहरी जीवनातील प्रसंगांचे चित्रण केले आहे. ग्रामीण भागातील दु:ख दारिद्र्य, दैन्य यांचा वेध त्यांनी "बुढीचं खाटलं" हया कथासंग्रहातील कथांनी वास्तवाचे भान राखून यशस्वीरित्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे. हे ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडवित असताना त्यांच्या अधिकतर कथांचा ओढा हा नागर कथेकडे झुकला आहे. मनोहर तल्हार यांनी आपल्या ग्रामीण कथांत आणलेली एकूण ग्रामीण माणसे आणि त्याचे स्वभाव व त्यांच्या शहरी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथांतील माणसे कांही वेगळ्या प्रकृतीची असली तरी ती वास्तवाशी नाते सांगणारी अशी

अशी आहे. एकंदर तल्हार यांच्या कथालेखनाची प्रवृत्ती काहीशी ग्रामीण असली तरी जास्त प्राधान्य दिले ते त्यांनी शहरी जीवनाच्या चित्रणाकडे.

## द.ता. भोसले :

द.ता. भोसले यांनी १९६० नंतर कथालेखनास प्रारंभ केला. त्यांचे एकूण सात कथासंग्रह आहेत. कथालेखनात ग्रामीणता असून त्याचबरोबर प्रादेशिकतेचे अंग आहे. त्यांची कथा तंत्राच्या चौकटीत बसविता येत नाही. तरी त्या कथेला स्वत:चे असे सत्व आहे. त्यांच्या सात कथासंग्रहापैकी अस्सल ग्रामीणतेची जाणीव असलेले दोनच कथासंग्रह आहेत. "आं आं म्हशी ।" व "पाऊस" हे ग्रामीणतेच्या दृष्टीने महत्वाचे कथासंग्रह आहेत. त्यात कथा आहेत त्या शेतमजुराच्या, आणि सामान्य शेतक-याच्या जीवनात घडणा-या घटनांच्या.

ग्रामीण जीवनातील बदलत चाललेल्या स्थितीगतीचे अत्यंत वास्तव आणि कलात्मक चित्रण त्यांनी या दोन कथासंग्रहात केले आहेत. शहरी जीवनापासून दूर असलेले कृषि जीवन आणि त्यात घडणा-या वेगवेगळ्या घटना यांचे चित्रण त्यांनी केले आहे. त्यांचा "आं आं म्हशी" हा कथासंग्रह ग्रामीण विनोदी कथा संग्रह म्हणून प्रसिध्द आहे. तर "पाऊस" हया कथासंग्रहात खेडयातील स्त्री जीवनातील गुदमरलेपणा त्यांनी चित्रित केला आहे.

१९६०"६१ च्या दरम्यान ग्रामीण कथालेखन करणारे चंद्रकुमार नलगे यांनी कथालेखन केले. त्यांच्या एकंदर कथेच्या रचनेचा विचार केल्यास ती फडकेंच्या तंत्रातील रंजकतेची ओढ असणारी अशी वाटते. चंद्रकुमार नलगे यांच्या कथा हया गावाकडच्या गोष्टी या रुपाने प्रसिध्द

झाल्या आहेत. त्या कथांमध्ये थोडासा वास्तवाचा आधार घेऊन रंजकतेसाठी सांगितलेली गोष्ट असाच सुर त्यांच्या कथांमधून निघतो. कथेच्या ठराविक साच्यात बसविण्यांचा त्याचा प्रयत्न हा कथेला अवास्तवता आणि योगायोग यामुळे बाधक वाटते.

मराठी ग्रामीण कथेत १९६५ पासून कथा लिहिणारे आणि ग्रामीण कथेत स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण करणारे कथालेखक म्हणून भास्कर चंदनशिव यांचा विचार केला जातो. त्यांच्या पहिल्याच कथासंग्रहाने जे नवीन विशेष दाखविले ते म्हणजे प्रतिमांच्या माध्यमातून वाचकांशी संवाद साधण्याची ही जी पध्दत आहे ती त्यांनी ग्रामीण कथेत प्रथम आणली. हा प्रयोग त्यांनी आपल्या "जांभळ ढव्ह" या कथासंग्रहात केला आहे व १९८० साली हा कथासंग्रह प्रसिध्द झाला.

"मरणकळा" (१९८३) साली प्रसिध्द झालेल्या त्यांच्या कथासंग्रहाने मानवतेचा ओलावा निर्माण केला आहे. कोणत्याही सीमारेषा न ठेवता मानवी व्यथा, वेदना यांच्या तळाशी जाऊन दुःख हे सर्व समाजातील लोकांना सारखेच असते, हे त्यांनी या कथासंग्रहात सांगितले आहे. त्याचप्रमाणे काहीसा वेगळा प्रयोग करणारा कथासंग्रह म्हणजे "अंगारमाती" (१९९१). या कथांमध्ये जो ग्रामीण भागातील शेतकरी कसा पिढयान्पिढया आहे तसा आहे त्यातून बाहेर पडण्यासाठी तो नव्या आत्मभानातून विरोध करतो आहे. भास्कर चंदनशिव यांनी ग्रामीण दलित आणि ग्रामीण माणूस यातील बदलत्या जाणिवांचा शोध घेतला आहे. या दृष्टिकोनातून त्यांचा "नवी वाळे" हा कथासंग्रह महत्वाचा आहे, त्याचबरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी वर्ग कसा आपल्याच गरीब बांधवांना कसा खाली खेचतो हे दाखविले आहे. आणि त्यामुळे तो त्याला खाली खेचता खेचता स्वतःच त्यापेक्षा कसा

खाली जातो याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांच्या "नवी वारूळ" या कथासंग्रहातील कथा. एकंदर त्यांच्या सर्व कथांतून समाजातील विविध दुःख मांडली आहेत. त्यांच्या कथांनी ग्रामीण माणसातील वास्तवतेचे दर्शन घडविले आणि भास्कर चंदनशिव यांनी ग्रामीण कथेला एक नवे वळण प्राप्त करून दिले.

१९७० च्या नंतर म्हणजे भास्कर चंदनशिव यांच्या कथा-लेखनाच्या काळापासून बदलत्या ग्रामीण जीवनाचे दर्शन ग्रामीण कथेमध्ये दिसू लागले. हे चित्रण यापूर्वी आनंद यादवांच्या, "उखडलेली झाडे" ह्या कथासंग्रहातील कथांनी दाखविले आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील सहकारक्षेत्र, राजकारण यांनी ढकलून दिलेला ग्रामीण माणूस यांचेही चित्रण प्रामुख्याने १९७० नंतर ग्रामीण कथेत येवू लागले आणि त्याच बरोबर ग्रामीण स्त्री झालेली मानसिक कुचंबणा हाही प्रश्न काही लेखकांनी हाताळला आहे. परंतु ग्रामीण स्त्री मनाचा वेध घेण्याचे महत्वाचे कार्य केले ते सरोजीनी बाबर व प्रतिमा इंगोले यांनी. १९७० च्या ग्रामीण कथालेखकांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. त्यामध्ये रंगनाथ पठारे, बाबाराव मुसळे आणि सदानंद देशमुख त्यांच्या बरोबरीने अपवादात्मक ठरलेल्या ग्रामीण कथालेखिका म्हणून सरोजिनी बाबर आणि प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

रंगनाथ पठारे :

बदलत्या जीवनाबरोबरच ग्रामीण जीवन बदलू पाहते. परंतु जो अंतर्मनात रूजलेला आणि कृषी संस्कृतीशी नाते जोडणारा माणूस तसा बदललेला नाही. बदलत्या औद्योगिक जगाच्या नकाशावर

खेडेही बदलू पाहत आहे. रंगनाथ पठारे यांनी याविषयी जो खेड्याचा केंद्रस्थानी असलेला तालुका आहे आणि तेथूनच गावांचा बदलणारा चेहरा मोहरा बदलण्याचे केंद्रस्थान मानले गेले या केंद्रस्थानी घडलेले बदल न कळत ग्रामीण खेडे बदलण्यास कारणीभूत ठरले.आहे. याचा वेध पठारे यांनी घेतला आहे. त्यांच्या एकंदर सत्तरहून अधिक कथांमधून त्यांनी अनेक विषय हाताळले आहेत. त्यात त्यांनी समकालीन वास्तवातून कथाबीजे निवडली आहेत. पठारे यांनी ग्रामीण, नागर असा काही प्रमाणात भेद न करता माणूस म्हणून त्याचा घेतलेला वेध अत्यंत समाधानकारक आहे. सोमन म्हणतात, "एकंदरीत "स्पष्ट-वक्तेपणाचे प्रयोग" हा कथासंग्रह केवळ ग्रामीण कथेच्या संदर्भातच नाही, तर एकूण मराठी कथेच्या संदर्भात महत्वाचा ठरतो. कथा या आकृति-बंधाची लवचिकता दाखवित या वाङ्मयप्रकाराच्या नव्या शक्यता सूचित करतो."[१४]

विदर्भाच्या ग्रामीण भागाचे दर्शन बाबाराव मुसळे यांच्या कथेतून दिसून येते. त्याचप्रमाणे ग्रामीण बोली आणि लोकजीवनातील चालीरिती यामुळे त्यांच्या कथा ग्रामीण समाजाचे सद्यःरूप दाखवितात व ते दाखवित असताना बदलत्या ग्रामीण जीवनाची आव्हाने पेलण्यास समर्थ होणारा परंतु अनेक बाबींनी मागास असा कष्टकरी समाज नवी औद्योगिक आव्हाने पेलू शकत नाही. आणि त्यामुळे त्यांची झालेली अवस्था याचे चित्रण त्यांनी आपल्या कथेत केले आहे. "पायाळू माणसांच्या अंगावर पावसाळ्यात वीज पडते" ही अंधश्रध्दा "इंधन" या कथेत केंद्रबिन्दू आहे. ही ग्रामीण कथेच्या अंगाशी एकदम जवळीक साधणारी कथा आहे. प्रवाही निवेदन आणि ठसकेदार बोलीतील संवाद यामुळे बाबारावांच्या कथांचे विशेष आहे.

सदानंद देशमुख यांनी ग्रामीण माणसाच्या मनोविश्लेषणाच्या माध्यमातून कथा साकार करतात. शासकीय योजना आणि त्यामुळे वंचित राहिलेला सर्वसाधारण माणूस व त्याची झालेली अवस्था ही देशमुखांनी योग्य रितीने दाखविली आहे. ही स्थिती दाखवित असताना सरकारी लाल फितीचा कारभार, त्यावर टीका किंवा उपहास न करता, यामुळे सर्वसामान्यांची झालेली कुतरओढ यशस्वीपणे दाखविली आहे. ग्रामीण तरूण पिढीच्या महत्वाच्या प्रश्नाला देशमुख यांनी हात घालण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रामीण भागातील शैक्षणिक सुधारणामुळे तरूण पिढी सुशिक्षित झाली आणि यातून जो वेगळया प्रकारचा ताण ग्रामीण भागात निर्माण झाला त्याचे चित्रण सदानंद देशमुख यांनी अचूक केले आहे. शंकर पाटील यांच्या नंतर ग्रामीण स्त्री मनाचे दु:ख मांडणारे कथाकार म्हणून सदानंद देशमुख यांचा उल्लेख केला जातो. कुटुंबव्यवस्थेत स्त्रीची झालेली कुचंबणा आणि पुरुषी स्वभावामुळे ग्रामीण स्त्रीला भोगाव्या लागणा-या वेदना याही काही प्रमाणात त्यांच्या कथेत आल्या आहेत. परंतु तेवढाच विषय त्यांच्या कथेचा नसून चौफेर विचार क्षमता त्यांच्या कथेमध्ये जाणवते. त्यांच्या कथेविषयी अंजली सोमण म्हणतात, "आपल्या कथांमध्ये स्त्री दु:ख एकसुरी पध्दतीने न मांडता देशमुख स्त्रीच्या दु:खाचे सूक्ष्म आणि वेगवेगळे पदर दाखवतात."[१५]

शा.कृ. कुरुंदवाडे यांचा १९८२ साली प्रकाशित झालेला "रक्ताचं नातं" हा कथासंग्रह आहे. शेती जीवनातील आणि त्यावर आधारित घटनांचा यामध्ये वेध घेतला आहे. गणेश बोंडगे यांनी ग्रामीण जीवनातील विशेषत: दारिद्री दु:खी जीवनातील व्यथावेदनांना आपल्या कथेचे विषय बनविले आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील गावकुसाबाहेरील जीवन त्यांनी चित्रित केले आहे. त्या जीवनातील

व्यक्तीच्या वेदनांचे चित्रण, "शिवणाक्ळ", "चांदवा", "गुलाब", "खोपा" इत्यादि कथांमधून येते. त्यांच्या कथांतून एकंदरच ग्रामीण मन गावातील व गावकुसाबाहेरील ही प्रकट होते.

प्रतिमा इंगोले :

ग्रामीण कथेच्या क्षेत्रात कथालेखिकेची संख्या फारच कमी आहे. म्हणून प्रतिमा इंगोले यांचा ग्रामीण कथालेखिका म्हणून अभ्यास करणे आवश्यक आहे. लोकसाहित्याच्या अनुषंगाने कथा लेखन करणाऱ्या सरोजिनी बाबर या नंतर प्रतिमा इंगोले यांनी प्रथमच ग्रामीण कथेत पदार्पण केले आणि यशस्वी ग्रामीण कथालेखिका म्हणून प्रसिद्ध झाल्या आहेत. "हजारी बेलपान" या पहिल्या ग्रामीण कथासंग्रहाने ग्रामीण कथेमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण कथेत भर घातली. नुसती भर घातली नाही तर गुणात्मक विकास घडविला. त्याच्या अस्सल वऱ्हाडी बोलीचा ठसकेदारपणा त्यांनी "लेख मुईची" (१९९१), "अकसिदीचे दाने" (१९८६) या दोन कथासंग्रहामध्ये वापर केला आहे. केवळ स्त्रीवादी भुमिकेतून लिखाण न करता वास्तवाशी सांगड घालून त्यांच्या कथेचा विकास स्थुलाकडून सुक्ष्माकडे झालेला दिसतो. विदर्भातील दारिद्र्य दुःख याचबरोबर स्त्रीच्या दुःखाची मांडणी करणारे त्यांचे कथालेखन आहे.

सारांश :

ग्रामीण कथेच्या स्वरुप आणि विकासाचा आराखडा लक्षात घेत असताना हरिभाऊंच्या कथेने सुरुवात होते. १८९७ सालच्या "काळ तर मोठा कठीण आला होता" या कथेने ग्रामीण कथेला

सुरुवात होते. आणि ही कथा ग्रामीण कथेची सुरुवातीची कथा म्हणून सर्वमान्य आहे. त्यानंतर ग्रामीण कथेमध्ये गांधीवादाच्या परिणामामुळे ग्रामीण कथाही लिहिली गेली. गांधीजींच्या "खेड्याकडे चला" या घोषणेमुळे ग्रामीण कथेमध्येही भर पडली. त्यामध्ये प्रामुख्याने गोमंतकीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा लिहिल्या गेल्या. या कथाकारांनी काहीसे रंजनवादी स्वरुपाने ग्रामीण कथा लिहिल्या त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण कथा लिहिल्या असे म्हणता येत नाही.

श्री.म. माटे यांनी "उपेक्षितांचे अंतरंग" उलगडून दाखविले तर म.भा. भोसले यांनी "मुका मार" सारखी कथा लिहून उपेक्षित समाजाचे दु:ख चित्रित केले आहे. याच दोन कथाकारांनी या काळात अस्सल ग्रामीण कथेला पुढे नेले. आणि तिचा विकास केला. त्यानंतरच्या कथाकारांनी ग्रामीण कथेला शहरी वाचकाला रुचेल अशाच पध्दतीचे वळण लावले. वि.य. मराठे, य.गो. जोशी, कवठेकर आणि दांडेकर इ. कथालेखकांनी ग्रामीण कथेचा अस्सलपणा जोपासला नाही असेच म्हणावे लागेल.

१९४५ नंतर मराठी कथेत नवकथेचा कालखंड सुरु झाला होता. आणि नवकथेच्या जडणघडणीत गाडगीळ, भावे, गोखले यांनी मोलाचे कार्य केले. त्याचप्रमाणे ग्रामीण कथेला नवकथेच्या रुपाने पुढे नेले ते व्यंकटेश माडगूळकर यांनी.

माडगूळकरांनी माणदेशी प्रदेशाचे चित्रण तेथील व्यक्तींच्या गुण-दोषासहित चित्रित केले आहे. त्यांनी निवेदनासाठी नागरभाषा आणि संवादासाठी ग्रामीण बोली वापरून संपूर्ण भाषेचा परिसर उभा केला आहे. त्याच प्रमाणे शंकर पाटील यांनी नागरी आणि

ग्रामीण बोलीचा योग्य मेळ घालून ग्रामीण कथा बहरली आहे. त्यांच्या कथालेखात प्रामुख्याने ग्रामीण कुटुंबातील व्यक्तींच्या मनाचे ताण-तणाव चित्रित केले आहेत. शंकर पाटील यांच्या बरोबरीने ग्रामीण जीवन आणि त्याच जीवनातील जे गावकुसाबाहेरील अस्पृश्य यांच्या व्यथा वेदना आपल्या कथेमध्ये मांडल्या आहेत त्या आण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात यांनी. ग्रामीण जीवनातील विसंगती विनोदाच्या रुपाने मांडण्यात द.मा. मिरासदार यशस्वी झाले आहेत. ग्रामीण माणसाच्या व्यंगावर बोट ठेवले आहे आणि या रुपाने दिसणारे ग्रामीण जीवन त्यांनी रेखाटले आहे.

१९६० नंतरच्या ग्रामीण कथेमध्ये लक्षणीय बदल घडला. याला एकमेव कारण म्हणजे ग्रामीण भागात झालेला शिक्षणाचा विकास आणि या शिक्षणामुळे ग्रामीण कथाकार जन्माला आले. स्वत: अनुभवलेले ग्रामीण विश्व तेथील अनेक प्रसंग आणि घडलेल्या घटना त्यांनी आपल्या कथेच्या रुपांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

बदलेले ग्रामीण जीवन त्या जीवनात वर्तमान काळात निर्माण झालेले प्रश्न, समस्या तसेच बदलत्या खेड्यातील बदलते जीवनमान आणि ते तेथील बदलते वास्तव यांचा वेध आणि आज आकारत आलेले खेडे, पारंपारिकतेशी नाते ठेवणारे खेडे कसे आहे याचे चित्रण काही कथाकारांनी केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने उध्दव शेळके, बोराडे, यादव, भास्कर चंदनशिव, सदानंद देशमुख, रंगनाथ पठारे, द.ता. भोसले, प्रतिमा इंगोले, या प्रमुख कथाकारांनी आपल्या कथांतून चित्रण केले आहे.

ग्रामीण कथेच्या स्वरुपाच्या विकासाचा आढावा प्रतिमा इंगोले यांच्या पर्यंत या प्रकरणात घेतलेला आहे. आता पुढच्या प्रकरणात

प्रतिमा इंगोले यांच्या "लेक भुईची", "सुगरणाचा खोपा", "अकसिदीचे दाने" या कथासंग्रहाच्या आधारे त्यांच्या कथालेखनातील आशयाचा विचार केलेला आहे.

---

## प्रकरण पहिले

### संदर्भ


१) यादव, आनंद - ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, तृतीय आवृत्ती, १९९३, पृ.११.

२) तत्रैव, पृ. १४.

३) तत्रैव, पृ. १४.

४) चवरे, रा.गो. - मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, प्रथम आवृत्ती, ऑक्टो., १९९५, पृ. २६४.

५) हातकणंगलेकर, म.द.- मराठी कथा : रुप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती, मार्च, १९८६, पृ. ४५.

६) ठाकूर, रविंद्र - आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथम आवृत्ती, जुलै, १९९३, पृ.८.

७) कोत्तापल्ले, नागनाथ - साहित्याचा अन्वयार्थ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर, १९९६, पृ.१९०.


13522
A

८) कानडजे, एम्.एम्. - आनंद यादव : साहित्य आणि जीवन,
स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-८,
प्रथमआवृत्ती, मार्च, १९९५, पृ. ५६.

९) कोत्तापल्ले,नागनाथ - ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध,
मेहता पब्लिशिंग हाउस,पुणे-३०,
प्रथम आवृत्ती, जानेवारी, १९८५,
(बोराडे यांची मुलाखत), पृ. १२४.

१०) कुंभार, प्रकाश - दलित कथासाहित्य,
प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर,
प्रथम आवृत्ती, ऑगष्ट,१९९१, पृ.४७.

११) तत्रैव, पृ. १०५.

१२) मुलाटे, वासुदेव - ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास,
साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद,
प्रथम आवृत्ती, जानेवारी, १९९२, पृ.८२.

१३) कोत्तापल्ले,नागनाथ - ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध,
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे-३०,
प्रथम आवृत्ती, जानेवारी, १९८५,
पृ. २१.

१४) सोमण, अंजली - मराठी कथेची स्थिती गती,
प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०,
प्रथम आवृत्ती, १९९५, पृ. १८२.

१५) तत्रैव, पृ. १९०.


-----